३९

18 OCT 2013
आवक क्रमांक 758
विभाग

**सांस्कृतिक कार्य विभागामार्फत देण्यात येणा-या पुरस्काराच्या रकमा वाढविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शासन निर्णय क्र. पूरक-२०११/ प्र.क्र. १५० /सां.का.४**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : ७ ऑक्टोबर, २०१३**

**वाचा :-** शासन निर्णय क्र. पूरक-२०११/प्र.क्र. १५०/सां.का.४, दिनांक : १३ एप्रिल, २०१२

**प्रस्तावना** — सांस्कृतिक कार्य विभागामार्फत देण्यात येणा-या पुरस्कारांच्या रकमा संदर्भाधीन शासन निर्णयान्वये वाढविण्यात आल्या आहेत. याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असतानाच्या कालावधीत काही नवीन पुरस्कार जाहीर करण्यात आले. सदर नव्याने जाहीर पुरस्कारांच्या रक्कमा संदर्भाधीन शासन निर्णयाच्या अनुषंगाने वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -** विचारांती मराठी चित्रपट पुरस्कार या क्षेत्रातील खालील दोन पुरस्कारांच्या रक्कमा पुढीलप्रमाणे वाढविण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पुरस्काराचे नांव | पुरस्काराची रक्कम | पुरस्काराची वाढीव रक्कम |
|---|---|---|---|
| १ | प्रथम पदार्पण निर्माता | रु. ५०,०००/- | रु. १,००,०००/- |
| २ | प्रथम पदार्पण दिग्दर्शक | रु. ५०,०००/- | रु. १,००,०००/- |

यासाठी होणारा खर्च मागणी क्र. झडेडी-२, २२०५ कला व संस्कृती, १०२ कला व संस्कृती यांचे प्रचालन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०३) मराठी चित्रपट महोत्सव, (०३) (१) मराठी चित्रपट महोत्सव (२२०५ १५४३) - ५० इतर खर्च या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**

७/१०/१३

**( गीता रा. कुलकर्णी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. मा. मंत्री (सां.का.) यांचे खाजगी सचिव
२. मा. राज्यमंत्री (सां.का.) यांचे खाजगी सचिव
३. प्रधान सचिव,पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
४. महालेखापाल (महाराष्ट्र १) (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई
५. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
७. उपसचिव पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
८. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय,मुंबई
९. अवर सचिव (सां.का-१ व अर्थसंकल्प शाखा) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. निवड नस्ती, सां.का.४